महाराष्ट्र शासन–कृषि विभाग

# संचालक फलोत्पादन

भूजल भवन शेजारी, के.बी. जोशी पथ,
शिवाजी नगर, पुणे - ४११००५

दुरध्वनी क्र. ०२०-२५५३७६७३ E-mail Id- agridrip@rediffmail.com

कृआ-२०२३/राकृवियो-प्रथेंअपी/नोंदणी/ ४०३४ /फलो-४
पुणे - ४११ ००५, दि. ०५/ ०२/२०२४

**वाचा :-**

१. केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - प्रति थेंब अधिक पिक (सुक्ष्म सिंचन) योजनेच्या कार्यात्मक मार्गदर्शक सुचना दि.०८/१०/२०२१

२. कृषि आयुक्तालयाने सन २०२३-२४ सुक्ष्म सिंचन उत्पादक नोंदणीसाठी निर्गमित केलेले सुचनापत्र क्रं ४४३८ दि.०७/०२/२०२३

३. कृषि आयुक्तालयाचे पत्र जाक्र/सुसिंयो-फलो.४/मा.सू./१७८५८/२०२३ दि.२९/०५/२०२३

---

## नोंदणी आदेश

राष्ट्रीय कृषि विकास योजना- प्रति थेंब अधिक पिक (सुक्ष्म सिंचन) योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये सुक्ष्म सिंचन साहित्याचा पुरवठा करण्यासाठी संदर्भ क्रं १ वरील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनातील अटी व शर्तींची पुर्तता होत असलेल्या **नम्रता ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा.लि.** या उत्पादकास नोंदणीकरीता मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सर्वदृष्टया वैध असलेल्या व भारतीय मानक ब्युरोचे (BIS) वैध प्रमाणपत्र तसेच, जीएसटीएन धारण करणाऱ्या सोबत जोडलेल्या ***परिशिष्ट- १*** मध्ये नमूद तपशिलाप्रमाणे सन २०२३-२४ ते २०२७-२८ या पाच वर्षासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सुक्ष्म सिंचनाची कामे करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सूक्ष्म सिंचन योजना अंमलबजावणीसाठी या आदेशान्वये सूक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनीची करण्यात आलेली नोंदणी ***सन २०२३-२४ ते २०२७-२८*** या **पाच (५)** वर्षांसाठी वैध राहिल. मात्र सदरहू उत्पादकाने पुढील प्रत्येक वर्षी कृषि आयुक्तालयाने विहित केलेले शुल्क भरुन नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

२. या आदेशान्वये नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या उत्पादकाने परिशिष्ट - १ मध्ये नमूद प्रत्येक घटकांच्या बीआयएस वैधतेची मुदत संपल्यानंतर ४५ दिवसात वैध बीआयएस प्रमाणपत्र कृषि आयुक्तालयास सादर करावे अन्यथा सदर नोंदणी आपोआप रद्द होईल.

३. नोंदणीच्या वेळी सादर केलेल्या दरपत्रकातील दरापेक्षा जास्त दराने, कोणत्याही घटकांची विक्री करता येणार नाही. तसेच सदरचे दरपत्रक कृषि आयुक्तालयाच्या इ-ठिबक आज्ञावलीवर नोंदणीवेळी भरणे आवश्यक आहे. उत्पादकाने त्यांच्या दरपत्रकात त्या आर्थिक वर्षात वाढ किंवा घट केल्यास इ-ठिबक आज्ञावलीवर भरणे व कृषि आयुक्तालयास त्वरित कळविणे बंधनकारक राहील.

४. नोंदणीप्राप्त जिल्हयात विक्रिपश्चात सेवा केंद्र उभारणी करणे व त्याबाबतची आवश्यक ती माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करुन सेवा केंद्राची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी संबधीत उत्पादकाची राहील.

५. मान्यता दिलेल्या प्रत्येक जिल्हयातील वितरकांची यादी नोंदणीसाठी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडे सादर करुन वितरक नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.

६. नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादकाने, उत्पादीत केलेल्या व वितरकांना पुरवठा केलेल्या सर्व घटकांचा घटकनिहाय अहवाल प्रत्येक तिमाही संपताच पुढील माहिन्याच्या १० तारखेपर्यत विहीत प्रपत्र-५(अ) व ५(ब) मध्ये सादर करणे आवश्यक राहील.

७. सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांनी निश्चीत केलेल्या उद्दीष्टाप्रमाणे सुक्ष्म सिंचनाची कामे करण्याची जबाबदारी संबंधित उत्पादकांची राहील. तथापि उत्पादक कंपनीला राज्यात किमान ५०० हेक्टर क्षेत्रावर सुक्ष्म सिंचनाची कामे करणे बंधनकारक राहील. तसेच मान्यता दिलेल्या प्रत्येक जिल्हयामध्ये किमान १०० हेक्टर क्षेत्रावर सुक्ष्म सिंचनाची कामे करणे बंधनकारक राहील.

८.केंद्र शासनाने सन २०२१ मध्ये योजनेच्या कार्यात्मक मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. यापुढे केंद्र, राज्य शासन, कृषि आयुक्तालय स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सुचना, अटि व शर्ती सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्या व त्यांच्या अधिकृत वितरकांवर बंधनकारक राहतील.

सोबतः. **परिशिष्ट १.**

**(डॉ. के.पी.मोते)**
**संचालक फलोत्पादन**
**कृषि आयुक्तालय, पुणे-५**

**प्रति,**

**नम्रता ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा.लि.**

**प्रतिलिपी - यांना माहितीसाठी व पुढील प्रमाणे कार्यवाहीसाठी अग्रेषीत.**

**१) विभागीय कृषि सहसंचालक, सर्व**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

१/- सन २०२३-२४ या वर्षासाठी जिल्हास्तरावर संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयातील वितरकांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वितरक नोंदणीसाठी आवश्यक असलेले व कृषि आयुक्तालयाने विहित केलेले ***शुल्क रु.२७५०/- (अक्षरी रु.दोन हजार सातशे पन्नास फक्त) ग्रासप्रणालीव्दारे/चलनाव्दारे संबंधित लेखाशिर्षांतर्गत भरुन घ्यावे.*** तसेच रु.१०,०००/-(अक्षरी रु. दहा हजार फक्त) रकमेची बँक गॅरंटी घेवून दि.०८.०८.२०२२ रोजीच्या मार्गदर्शक सुचनानुसार वितरकांची नोंदणी करावी. (ठिबक व तुषार या करीता शुल्क स्वतंत्र भरण्याची आवश्यकता नाही)

२/- संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व त्यांचे जिल्हातील सुक्ष्म सिंचन वितरक या दोघामधील कृषि आयुक्तालयाने संदर्भ क्रं २ नुसार निर्गमित केलेल्या सुचनापत्रामध्ये विहित करुन दिलेल्या नमुन्यातील करारनामा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी रु.१००/-च्या स्टँम्प पेपरवर नोटराइज्ड करुन घ्यावा.

३/- सन २०२३-२४ मध्ये सुक्ष्म सिंचन योजनेच्या अंमलबजावणीत कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता कंपन्या त्यांचे वितरक/विक्रेते तसेच कृषि विभागाच्या अधिकारी/कर्मचा-यांनी घेणे आवश्यक आहे.

# परिशिष्ट क्र.१

सन २०२३-२४ मध्ये नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या उत्पादकांची यादी

उत्पादकाचे नाव : **नम्रता ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा.लि.**

इ मेल namrataagro1972@gmail.com

जीएसटी क्र. 27AAICN4635R1ZP

## सूक्ष्म सिंचन घटक : तुषार सिंचन

| BIS Component | BIS NO | CML NO | मान्यता प्राप्त जिल्हे | |
|---|---|---|---|---|
| PVC Pipes | IS 4985 | 7168578 | जळगाव | धाराशीव |
| QC Sprnk. Pipe | IS 17425 | 7400051299 | छ.संभाजीनगर | नांदेड |
| Rot.sprinkler | IS 12232 (1996) | 8205260 | जालना | हिंगोली |
| Rot.sprinkler | IS 12232 (1996) | 8939410 | परभणी | वर्धा |
| ---- | ---- | ---- | बीड | यवतमाळ |
| ---- | ---- | ---- | बुलढाणा | नागपुर |
| ---- | ---- | ---- | अकोला | अमरावती |
| ---- | ---- | ---- | वाशिम | लातुर |
| ---- | ---- | ---- | धुळे | चंद्रपुर |
| ---- | ---- | ---- | नंदुरबार | भंडारा |
| ---- | ---- | ---- | अहमदनगर | गोंदिया |
| ---- | ---- | ---- | एकुण | २२ जिल्हे |

**वैधता कालावधी : सन २०२३-२४ ते २०२७-२८**

**संचालक**

फलोत्पादन